
## मेट्रो-३ प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांना न्यायालयाने फटकारले

# हिरवळीचा बळी दिला जात असल्याचा कांगावा नको!

**प्रतिनिधी, मुंबई**





**मेट्रो-३ प्रकल्पासाठी** मुंबईतील हिरवळीचा बळी दिला जात असल्याचा कांगावा करणे सोडा आणि व्यावहारिक दृष्टीकोनातून या प्रकल्पाकडे पाहा, असे सुनावत या प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांना उच्च न्यायालयाने फटकारले. हा प्रकल्प ३० वर्षांपूर्वी व्हायला हवा होता. मात्र तो आता होत आहे, असेही न्यायालयाने सुनावले.

मुंबईतील वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गुंतागुंतीची होत असून आताच त्यावर तोडगा काढण्यात आला नाही, तर पुढे ती आणखीन बिकट होईल. ही परिस्थिती लक्षात घेता मुंबईसाठी हा प्रकल्प खूप महत्त्वाचा आहे, असे न्यायमूर्ती विद्यासागर कानडे आणि न्यायमूर्ती ए. एम. बदर यांच्या खंडपीठाने विशेषकरून नमूद केले. खरेतर हा प्रकल्प ३० वर्षांपूर्वी व्हायला हवा होता. उशिरा का होईना आता तो कार्यान्वित होत आहे. मात्र त्याच्याकडे व्यावहारिक दृष्टीकोनातून पाहण्याऐवजी त्याला विरोध केला जात आहे. असे करून प्रकल्पाला विलंब केला जात आहे, असेही न्यायालयाने म्हटले.

हजारो लोक दररोज उत्तर मुंबईतून दक्षिण मुंबईत लोकलने प्रवास करतात. तर बरेच लोकांचा प्रवासादरम्यान अपघाती मृत्यू होतो. ही बाब लक्षात घेतली तर हा प्रकल्प लोकांच्या फायदाचा आहे. त्यामुळे या प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांनी आधी या सगळ्याचाही विचार करायला हवा, असेही न्यायालयाने सुनावले.

वांद्रे-कुर्ला संकुलातील प्रस्तावित मेट्रोच्या स्थानकासाठी १०८ खारफुटी तोडण्याकरिता परवानगी द्यावी, या मागणीसाठी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ लिमिटेडने (एमएमआरसीएल) याचिका केली आहे. यासाठी पर्यावरण मंत्रालयाकडूनही परवानगी घेण्यात आली असून त्याबदल्यात अन्यत्र वृक्षरोपण केले जाणार असल्याची हमीही देण्यात आली आहे, असेही एमएमआरसीएलने न्यायालयाला सांगितले. धारावी स्थानकासाठीही खारफुटी नष्ट करण्यात येणार असून स्थानकाचे काम झाल्यानंतर त्याच जागी चार हजार खारफुटी लावण्यात येतील, असा दावाही एमएमआरसीएलतर्फे करण्यात आला. याशिवाय प्रकल्पाला विरोध याचिका दाखल करण्यात आल्याने दोन महिने कामाला विलंब झाला आहे. परंतु आता प्रकल्पाला हिरवा कंदील दाखवण्यात आल्याने काम सुरू झाले आहे. या प्रकल्पासाठी जपानकडून कर्ज घेण्यात आले आहे. परंतु याचिकेमुळे प्रकल्पाला विलंब झाल्याने बरेच आर्थिक नुकसान झाले आहे, असेही एमएमआरसीएलतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

परंतु एमएमआरसीएलकडून पर्यावरण मंत्रालयाची दिशाभूल करण्यात येऊन सीआरझेड क्षेत्रात बांधण्यात येणाऱ्या दोन स्थानकांसाठी परवानग्या मिळवण्यात आल्याचा आरोप याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला. सीआरझेड नियमानुसार भुयारी बांधकाम करता येऊ शकत नाही, असेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावर पर्यावरणाबाबत आम्हालाही चिंता आहे. परंतु सार्वजनिकदृष्ट्या हिताच्या प्रकल्पांना नागरिकांनी विरोध करू नये, असेही न्यायालयाने सुनावले.